(पुरवणी पृष्ठ संख्या २ )

# नातं

**कांचन गोडबोले** (क्लिवलँड ओहायो )



पहिलं नातं,
आईबाबांशी, खूप जिव्हाळ्याचे असतं
त्यानंतर नातं, निसर्गाशी- प्रतिकारशक्तीने लढायला शिकवतं
शाळेशी, आयुष्याला देते एक शिस्त
खेळाशी, कुठेतरी लागतं, पड़तं, पण
'लहानपण देगा देवा' असं जाणवतं
टेलीव्हिजनशी, करमणूक असते मस्त
बँकेशी, भविष्याच्या तरतुदीसाठी,
उघडावं लागतं बँकेत खातं
नोकरीशी, त्याशिवाय कशी मिळणार नं मिळकत?
कलेशी, स्फूर्तीने मन जागृत ठेवतं (१)
नातं,
आता कोरोनाशी, धैर्याने मन बळकट बनवतं
नातं,
परमेश्वराशी, देते अशी आठवण
जी कधीच नाही आपण विसरत (२)
नातं,
तंत्रज्ञानाशी, दूरच्या माणसांशी संवाद साधतं
आणि नातं आपल्या सणांशी,
ते साजरे करण्यासाठी माणसांशी जोडलं जातं (३)

नातं,
संक्रांतीशी, गोड बोलायला शिकवतं
रंगपंचमीशी, आयुष्यात रंग भरतं
गुढीपाडव्याशी, नवीन वर्षाचे नवचैतन्य निर्माण करतं
गोकुळाष्टमीशी, गोपालकाल्याचे,
आणि टीमवर्कचे महत्त्व समजावतं
गणपतीबाप्पाशी, बुध्दीच्या देवतेशी,
'अतिथि देवो भव' चे स्मरण करतं
दसऱ्याशी, सरस्वती पूजन करून,
ज्ञानास वृध्दिंगत करतं.
दिवाळीशी दिव्यांच्या प्रकाशाने
सकारात्मकता आणि कुटुंबातील एकोपा जपतं (४)
नातं,
सर्व सण साजरे करताना आपल्या
'मायबोलीतून' ते दृढ होत जातं
जन्मत: आपल्याशी बांधलं जातं
लांब गेलं, तरी ते बोलण्यासाठी परत बोलतं करतं
साद, प्रतिसाद देत रहातं
परंपरा आणि संस्कार मनांत वसवतं
भावनांना शब्दांत प्रकट करतं
आणि म्हणायला सांगतं,
"जय महाराष्ट्र! जय मराठी!" (५)
***

# कोरोना-व्हायरसचे कोडे

**- मुकुंद मार्तंड मोहरीर** (सॅन डिआगो, कॅलिफोर्निया)

मन माझे उन्मळले,
वावटळीसंगे गरगरले.
असे कसे हे घडले !
विपरित कोडे पडले
जंतूने जगता नमविले,
आक्रित अघटित कां घडले ? (१)

आठविले महाभारत युध्दाला,
अठरा अक्षौणि संहाराला
ही तर केशवाची करणी,
धर्मसंस्थापना वरणी
"भ्रामयन् सर्व भूतानि"
कळसुत्रीचे आम्ही प्राणि (२)
देवाजीने बुध्दी दिली,
मानवाने करणी केली
देवाजीची एकच ईच्छा,
शिरजोर मानवा पुन्हा शिक्षा
खेळ खेळला नियतीचा,
करोना नुसता निमित्ताचा (३)

रहाटगाडगे युगायुगाचे,
गरगर फिरवी मानवा ते
गीतारहस्याचा हा पाठ,
हाच जीवनी परिपाठ
कोडे सुटतील कर्माचे,
सार्थक होईल जन्माचे (४)

***